प्रा.डॉ.श्री.शिवाजीराव रा.चव्हाण
एम्.ए.,पीएच्.डी.
किसन वीर महाविद्यालय, वाई.

# प्र मा ण प त्र

प्रमाणित करण्यात येते की, प्रा.श्री.मेनकुदळे शिवलिंग गंगाधर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. या पदवीसाठी सादर केलेल्या " चिपळूणकरपूर्व निबंधाचा अभ्यास " या प्रबंधिकेसाठी केलेले सर्व संशोधन माझ्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. प्रबंध लेखनात ज्या संदर्भ साहित्याचा आधार घेण्यात आलेला आहे त्याचा आवश्यक तेथे यथोचित निर्देश केलेला आहे.

प्रा.श्री.मेनकुदळे शिवलिंग गंगाधर यांनी ही प्रबंधिका स्वतंत्ररित्या लिहिली असून ती इतर कोणत्याही विद्यापीठातील कुठल्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदर प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्.पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

वाई.

दिनांक : २७।५।९२

( डॉ.शिवाजीराव रा.चव्हाण )
मार्गदर्शक

# प्र ति ज्ञा प त्र

" चिपळूणकरपूर्व निबंधाचा अभ्यास " या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. या पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

सातारा.

दिनांक : २९ मे १९९२.

( प्रा. मेनकुदळे एस्.जी. )
अभ्यासक

# ऋ ण नि र्दे श

एकोणिसावे शतक महाराष्ट्राच्या जडणघडणाचे शतक होते. १८१८ साली पेशवाईचा अस्त झाला आणि राजकीयक्षेत्राची सर्व सूत्रे इंग्रजांनी आपल्या हाती घेतली. महाराष्ट्रातील लोकांचे पारंपारिक विचार आणि इंग्रजांची वैज्ञानिक दृष्टी यांच्या संक्रमणाचा हा काळ होता. या शतकात महाराष्ट्रातील माणसांच्या मनाची एक प्रकारे मशागतच झाली. या सर्वांचा परिणाम मराठी वाङ्‌मयावरही होणे स्वाभाविक होते. ख-या अर्थाने मराठी वाङ्‌मयाची सुरवात याच कालखंडात नव्याने झाली. या सुरवातीच्या वाङ्‌मयनिर्मितीला आज अनेक वर्षे लोटून गेली आहेत. परंतु या मराठी वाङ्‌मयाच्या सुरवातीच्या साहित्याचा अभ्यासही तेवढाच महत्वाचा आहे असे असले तरी त्यासाठी लागणारी सर्व साहित्यिक माहिती मिळणे दुर्मिळच होते. त्यामुळे या विषयावर आपण एम्.फिल्. साठी प्रबंधिका तयार करावी असे मला मुळीच वाटत नव्हते. पण त्यामध्ये आवड निर्माण करण्यासाठीच जणू हा विषय माझे गुरुवर्य डॉ.चव्हाणसर व डॉ.नसिराबादकरसर यांनी माझ्यासमोर मांडला. त्या विषयाचे महत्व, वेगळेपण व आजच्या काळाची गरज या तिन्ही गोष्टी सरांनी मला समजावून सांगितल्या व तोच विषय निश्चित करुन मी त्यासाठी प्रयत्नशिल राहिलो.

माझ्या वैयक्तिक जीवनाचा हा काळ अत्यंत खडतर असा होता. अनेक प्रकारच्या अडचणी माझ्यासमोर उभ्या होत्या. यामध्ये सर्वात महत्वाची अडचण म्हणजे माझी आर्थिक परिस्थिती. पण याची जाणीव माझे सर्वस्व पाहणारे माझे प्राचार्य, आरबा डी.गायकवाडसाहेब व प्रा.सौ.गायकवाड मॅडम यांनी मला कधीच जाणवू दिली नाही. त्यांचे

व माझे गुरुवर्य डॉ.चव्हाणसर, डॉ.नसिराबादकरसर यांचे वात्सल्य, मार्गदर्शन व प्रयत्नवादी विचार यामुळे माझ्या संशोधनाचा धागा चिवट होत गेला व अनेक संकटातून मार्ग निघाला.

मला आई वडीलांचे वात्सल्य देणारे शिवाजी विद्यापीठातील बाबा सावंत (काका) व काकी यांच्या ऋणातून मी कधीच मुक्त होऊ इच्छित नाही. मी हे संशोधनाचे काम पूर्ण केले त्याचे श्रेय अग्रक्रमाने वरील माझ्या सर्व पालन कर्त्यांना द्यावे लागेल.

माझ्या उद्विग्न मन:स्थितीला दिलासा देणारे व प्रतिकूल परिस्थितीत सुध्दा खंबीरपणे उभे राहण्याची प्रेरणा विद्यापीठात पदवीत्तर शिक्षण घेत असल्यापासून माझे गुरुवर्य डॉ.नसिराबादकरसर व प्रा. प्रभाकर पाटीलसर यांनी मला दिली हे मी कधीच विसरु शकणार नाही.

माझे सहकारी प्राध्यापक यांनी असन्यसाधारण सहकार्य केल्यामुळेच मी हा पल्ला पूर्ण करु शकलो. प्रा.शिवाजीराव एम्.भोसले, प्रा.पांडुरंग भोसले, प्रा.सौ.वाडीकर, प्रा.घोरपडे, प्रा.सावंत ,प्रा.पाटील, श्री.शिवाजी एस्.भोसले,प्रा.माने, प्रा.बारकडे व माझे सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका यांच्या प्रेरणा व सहकार्य मला संशोधनकार्य पूर्ण करण्यास उत्साह निर्माण करीत होत्या. तर माझे प्राचार्य डॉ.विष्णुपंत जगताप यांनी वेळोवेळी माझ्या प्रबंधाची चौकशी करुन मला प्रोत्साहन दिले या सर्वांचे ऋण मी कधीच विसरु शकत नाही.

ही प्रबंधिका उत्साहाने व कार्यतत्परतेने मोजक्या वेळेत सुबक टंकलेखन करुन देणारे श्री.गजानन चंद्रकांत गोमासे यांचे मला खास आभार मानावयास पाहिजेत.

माझी प्रबंधिका पूर्णत्वाला घेऊन जाणारा आणखी एक महत्वपूर्ण भाग म्हणजे ग्रंथालयाची मदत. या प्रबंधिका लेखनाच्या काळात अनेक ग्रंथालयातून आवश्यक ते सर्व सहकार्य मला मिळाले. विशेषत: शिवाजी कॉलेज ग्रंथालयातून सर्व संदर्भग्रंथ मिळवून देण्याचे सहकार्य प्राचार्य,आर.डी.

गायकवाडसाहेब यांनी दिले व श्री॰पोरेसर, श्री॰पावसकरसर, श्री॰गायकवाडसर यांनी सर्व ती मदत केली॰ बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय व मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ येथील ग्रंथालयातूनही मला आवश्यकते सर्व संदर्भग्रंथ मिळाले, शासकीय ग्रंथालय, पुणे येथिल श्री॰दांईगडे सर यांनी तर सर्व सहकार्याची तयारी दाखविली व स्वत: पुस्तके शोधून दिली॰ डॉ॰के॰सी॰क-हाडकरसर यांनीही कांही निबंध मला उपलब्ध करून दिले॰ डॉ॰मोरजे यांनी योग्य ते मार्गदर्शन केले॰ या सर्वांना मी कधीच विसरु शकणार नाही॰

माझ्या आईवडीलांचे उपकार तर अनन्यसाधारण आहेत॰ स्वत: अर्धपोटी राहून मला त्यांनी सर्वकांही दिले॰ त्यांच्या ऋणातून मुक्त होण्यापेक्षा त्या ऋणामध्ये राहण्यातच मला सदैव आनंद वाटेल॰

माझे सर्व हितचिंतक, स्नेहांकीत, माझ्यावर जिवापाड प्रेम करणारे माझे मित्र श्री॰नितीन यादव, दिपक यादव, बाबासाहेब भोसले, सुनिल दिक्षित, अनिल दिक्षित, उमेश कुंभार, भारत भोसले, सुखदेव शिंदे, प्रा॰ सादिक देसाई, गणपतराव नांगरे, गजानन भोसले, उमाजी पाटील, श्री॰भारत शिंदे, नवनाथ जाधव, सुरेश जोगी, संजय शिंदे, मधुकर जाधव, डोंगरेसर व माझे सर्व सहकारी प्राध्यापक या सर्वांच्या प्रोत्साहनामुळे माझ्याकडून हे संशोधन झाले॰ माझ्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आपलेपणाच्या भावनेने मुद्दाम माझ्या प्रबंधिकेची चौकशी केली॰ ती मी कधीच विसरु शकणार नाही॰ या सर्व ऋणानुबंधित स्नेहांकीतांचे मी शतश: ऋणी आहे॰

अखेर सर्वांचे अंत:करणपूर्वक आभार मानून माझ्या पालककर्त्यांचे व गुरुवर्यांचे आभार मानतो॰ त्यांनीच ही वाङ्:मयसेवा करण्याची संधी मला उपलब्ध करुन दिली या ऋणानुबंधाची नम्रतापूर्वक जान ठेवून हा प्रबंध सादर करतो॰

सातारा॰ (प्रा॰मेनकुदळे शिवलिंग गंगाधर)

दिनांक : २८ मे १९९२॰ संशोधक

# अ नु क्र म णि का

# अनुक्रमणिका


| प्रकरण | नांव | पृष्ठांक |
|---|---|---|
| प्रकरण - | * ऋणनिर्देश | |
| | * अनुक्रमणिका | |
| प्रकरण - पहिले : | निबंधाच्या संकल्पनेचे स्वरूप/उत्पत्ती | 1 ते 27 |
| | अ) निबंध : उद्गम आणि विकास | |
| | ब) निबंध म्हणजे काय ? | |
| | क) मराठीतील "निबंध" हा शब्द | |
| | ड) इंग्रजीतील " Essay " चे स्वरूप | |
| | इ) मराठी निबंध लेखनामागील मुक उद्देश | |
| | ई) निबंधमाला पूर्व मराठी निबंध | |
| | ड) निबंधाचे प्रकार | |
| | १. ज्ञानप्रसारात्मक निबंध | |
| | २. मतप्रचारात्मक निबंध | |
| | ३. पत्ररूप निबंध | |
| | ४. व्यक्तिचित्रात्मक निबंध | |
| | उ) नियतकालिका : एक महत्वाचे माध्यम | |

| प्रकरण | नांव | पृष्ठांक |
|---|---|---|


ए) "मालापूर्व" नियतकालिकांचे स्वरुप

१. लोकशिक्षण

२. धर्मविचार

* ३. सामाजिक सुधारणांचा पुरस्कार

४. देशाभिमान जागृती

५. पूर्ववैभवाची जाणीव

* निष्कर्ष ✓

* संदर्भ-सूची ✓

प्रकरण- दुसरे : मराठी वाङ्‌मयाच्या प्रेरणा 23 ते 43

अ) इंग्रजांची ईहवादी दृष्टी

ब) धर्मप्रसार आणि वाङ्‌मय निर्मिती

क) संस्थांनी केलेली ग्रंथनिर्मिती

ड) शिक्षणाचा प्रसार

इ) गद्यास मिळालेले महत्व

ई) ज्ञानसंग्रह व ज्ञानप्रसार

उ) सामाजिक प्रेरणा

ऊ) वाङ्‌मयाचे परिणाम

ए) नियतकालिकांची कामगिरी

| प्रकरण | नांव | पृष्ठांक |
|---|---|---|
| | * निष्कर्ष | |
| | * संदर्भ-सूची | |
| **प्रकरण - तिसरे:** | चिपळूणकरपूर्व मराठी निबंध | 49 ते 86 |
| | अ) कुटुंबप्रवर्तननीति | |
| | ब) हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणे | |
| | क) स्त्रीविद्याभ्यास निबंध | |
| | ड) सुखदायी राज्यप्रकरणी निबंध | |
| | इ) नावल आणि नाटक ह्याजविषयी निबंध | |
| | * निष्कर्ष | |
| | * संदर्भ-सूची | |
| **प्रकरण - चौथे :** | चिपळूणकरपूर्व निबंधाचे स्वरूप | 87 ते 113 |
| | प्रास्ताविक | |
| | अ) आशय आणि अभिव्यक्ती | |
| | ब) अभिव्यक्तिचे वेगळेपण | |
| | क) वाङ्मयीन वैशिष्टये | |
| | ड) सामाजिक वैशिष्टये | |

| प्रकरण | नांव | पृष्ठांक |
|---|---|---|
| | इ) रचनेचे वेगळेपण | |
| | ई) भाषिक वैशिष्टये | |
| | * निष्कर्ष | |
| | * संदर्भ - सूची | |
| प्रकरण -पाचवे : | चिपळूणकरपूर्व निबंधाची मराठीला देणगी | 114 ते 125 |
| | प्रास्ताविक | |
| | अ) निबंधाची रचना | |
| | ब) वाङ्‌मयीन देणगी | |
| | क) सामाजिकता | |
| | ड) भाषिक देणगी | |
| | इ) नवनवीन वाङ्‌मयनिर्मिती | |
| | ई) नवनवीन लेखकांना चालना | |
| | * निष्कर्ष | |
| | * संदर्भ - सूची | |
| | उपसंहार | 126 ते 128 |
| | संदर्भ ग्रंथ सूची | 129 ते 132 |